# जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा

## परिपत्रक

क्रमांक : बी/सामान्य/ 38 /२०२६,आस्था. दिनांक : २३ /१०/२०२६

**संदर्भ :-** माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक Per.Gen.Sec./10946/2026, दिनांक २२.१०.२०२६

माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त निर्देशांनुसार, जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा तसेच अधीनस्थ तालुका न्यायालयांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व कर्मचारीवर्गास सूचित करण्यात येते की, आंतरजिल्हा बदली प्रस्तावाबाबत चौकशी करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेणे आणि संबंधित कार्यालयाची आवश्यक परवानगी व पूर्वनियोजित भेटीची वेळ (Appointment) प्राप्त करणे आवश्यक आहे.

त्यामुळे, आवश्यक परवानग्या व पूर्वनियोजित भेटीची वेळ घेतल्याशिवाय कोणत्याही कर्मचाऱ्याने माननीय उच्च न्यायालय, मुंबई (अपील शाखा) येथील प्रबंधक (कार्मिक) यांच्या कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊ नये किंवा दूरध्वनीद्वारे चौकशी करू नये.

यासंदर्भात यापूर्वीही दिनांक ०७.०२.२०२३ व १९.०९.२०२४ रोजी निर्देश देण्यात आलेले आहेत. तथापि, काही कर्मचारी आवश्यक पूर्वपरवानगी न घेता संबंधित कार्यालयास भेट देत असल्याचे किंवा दूरध्वनीद्वारे चौकशी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित कार्यालयाच्या नियमित कामकाजात अडथळा निर्माण होऊन प्रशासकीय गैरसोय होत आहे. म्हणून, आंतरजिल्हा बदली प्रस्तावाबाबत कोणतीही माहिती मिळवायची असल्यास, योग्य प्रशासकीय मार्गाने आवश्यक पूर्वपरवानग्या घेऊनच चौकशी करावी. या सूचनांचे सर्व कर्मचाऱ्यांनी काटेकोरपणे पालन करावे.

वरील निर्देशांचे उल्लंघन केल्यास संबंधित कर्मचाऱ्याचे कृत्य गैरवर्तन (Misconduct) म्हणून विचारात घेतले जाऊ शकते. तसेच, प्रचलित सेवा नियमांनुसार संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई किंवा अन्य योग्य प्रशासकीय कारवाई करण्यात येऊ शकते, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे व त्यांच्याकडून वरील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करून घ्यावे

Manand

(माधुरी आनंद)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
**भंडारा**

अंकन क्रमांक : बी/सामान्य/३८९६/२०२६,आस्था.

**प्रत माहितीकरिता रवाना :–**

०१) मा. जिल्हा न्यायाधीश–१/२/३/४/५ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, भंडारा.
०२) मा. तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, भंडारा.
०३) मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, भंडारा.
०४) मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, भंडारा.
०५) मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, भंडारा.
०६) मा. सह/२रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, भंडारा.
०७) मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर (जलदगती न्यायालय), भंडारा.
०८) मा. सह/२रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, भंडारा
०९) मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, साकोली/मोहाडी/तुमसर/पवनी/लाखांदूर/लाखनी.
१०) मा. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पवनी
११) मा. जिल्हा सरकारी अभियोक्ता, भंडारा
१२) स्वीय सहाय्यक, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा.
१३) न्यायालय व्यवस्थापक, जिल्हा न्यायालय, भंडारा
१४) अधिक्षक (प्रशासन/तांत्रिक विभाग),जिल्हा न्यायालय, भंडारा
१५) सहायक अधिक्षक (प्रशासन/अर्थ व वित्त/निरिक्षण/अभिलेख),जिल्हा न्यायालय, भंडारा
१६) वरिष्ठ लिपीक (प्रशा./राजपत्रित/इमारत/अर्थ व वित्त/ग्रंथालय/मुद्देमाल/सांख्यिकी/ अंदाजपत्रक),जिल्हा न्यायालय, भंडारा
१७) कनिष्ठ लिपीक (संगणक विभाग) जिल्हा न्यायालय, भंडारा

यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सादर/अग्रेषित.

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, भंडारा.

जिल्हा न्यायालय, भंडारा.
दिनांक : २३/१०/२०२६